# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

**९३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. .१७/०१/२०२०**

**जिल्हा : नंदुरबार**

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०१/२०२० ते १६/०१/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८/०१/२०२० ते २२/०१/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | २४ | २६ | २८ | २९ | २८ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | १२ | १५ | १६ | १५ | १४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | अंशतः ढगाळ | ढगाळ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४९ | ४४ | ५१ | ५० | ४१ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २५ | २१ | २४ | २५ | १९ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ७ | ९ | ३ | ७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | दिनांक २१ व २२ जानेवारी २०२० रोजी आकाश ढगाळ राहील. |
| सामान्य सल्ला | | शेतकऱ्यानी पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतःची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली/ १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सुरू ऊस | लागवडीची पूर्वतयारी | 1) सुरू ऊस लागवडीसाठी रान तयार करून ठेवावे. सुरू ऊसाच्या लागवडीकरीता को-८६०३२(निरा),को-९४०१२(सावित्री), को.एम.-०२६५ (फुले-२६५) या जातींचे बेणे निवडावे.<br>2) लागवडीपुर्वी प्रति हेक्टरी बेण्यासाठी १०० ग्रॅम बावीस्टीन + ३०० मि.ली. मेलॅथिऑन + १०० लिटर पाणी या द्रावणात १० मिनिटांसाठी बेणे प्रक्रिया केल्यानंतर १० किलो ॲसिटोबॅक्टर जीवाणू + १०० लिटर पाणी या द्रावणात वरील बेणे ३० मिनिटे बुडून लागवड करावी.<br>3) लागवडीच्यावेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५४ किलो युरिया) + ६० किलो स्फुरद (३७५ किलो सिं.सुपर फॉस्फेट) + ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. |
| हरभरा | जिरायती - घाटे भरण्याची अवस्था<br><br>बागायती - वाढीची अवस्था | 1) सध्याच्या ढगाळ हवामानामुळे हरभर्यावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी २ ग्रॅम इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>2) जिरायती हरभरा परिपक्व झाला असल्यास काढणी करुन घ्यावी. काही वाणामध्ये काढणीस उशीर झाल्यास घाटे गळ होऊ शकते.<br>3) घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी कामगंध सापळे हेक्टरी ५ या प्रमाणात लावावे.<br>4) घाटेअळीचा प्रादुर्भाव दिसताच निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडिरेक्टीन ( ३०० पी पी एम ) ५० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>5) ज्या ठिकाणी जिरायती हरभऱ्यात मोठ्या अवस्थेतील घाटे अळी आढळून येत असेल तर क्लोरान्ट्रानीलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे ( एकरी २०० लिटर पाणी ).<br>6) ढगाळ हवामानामुळे ज्या भागामध्ये माव्याचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसत असेल त्या ठिकाणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ५ टक्के अझाडिरेक्टीन ( ३०० पी पी एम ) ५० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| तुर | शेंगा पक्वतेच्या अवस्था | 1) शेंग माशी, घाटे अळी आणि पिसारा पतंग या किडींच्या नियंत्रणासाठी खालील फवारणी करावी :<br>2) इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के दाणेदार ४ ग्रॅम किंवा फ्लुबेंडामाईड २० टक्के दाणेदार ५ ग्रॅम किंवा क्लोरान्ट्रानीलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही ३ मिली प्रति १० लीटर पाण्यातून फवारावे ( एकरी २०० लिटर पाणी ).<br>3) लवकर परिपक्व होणाऱ्या वाणाची काढणी करून घ्यावी. |
| करडई | | मावा या किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| गहू | | मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्ल्यू.जी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भुईमुग | पेरणीपुर्व तयारी | उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी. पेरणीसाठी फुले उन्नती, टी.ए.जी.२४, टी.जी.२६, टी.पी.जी.४१, जे.एल.५०१ या वाणांपैकी निवड करावी. पेरणीचे अंतर ३० ×१० सें.मी. ठेवावे. त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे. |
| रब्बी ज्वारी | | लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी १.५% क्विनॉलफॉस भुकटी किंवा ५% मेलॅथि ऑन भुकटी २० किलो प्रति एकरी या प्रमाणात सकाळी वारा शांत असतांना धुरळावी. |
| कांदा | वाढ | कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% ईसी १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. ६ मि.ली. या कीटकनाशकांच्या आलटुन पालटुन फवारण्या कराव्यात.<br>कांद्यावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५ (०.३%) २५ ग्रम किंवा टेब्यॅकोनॅझोल (०.१%) १० मिली हे बुरशीनाशक १० लि टर पाण्यातुन आलटून-पालटून फवारावेत. |
| डाळिंब | | मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १७/०१/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**